# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २ रा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १५ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## महाकुंभसंदर्भात सर्वाधिक गूगल सर्च करतोय पाकिस्तान; यूएई, कतारबाबतही मोठा खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५प्रयागराज**

आता महाकुंभ केवळ भारतापुरताच मर्यादित राहिलेला नाही, तर जागतिक उत्सव बनला आहे. तीर्थराज प्रयागराज येथे सोमवारी महाकुंभाचा अर्थात कुंभमेळ्याचा भव्य शुभारंभ झाला. येथे इंग्लंड, अमेरिका, ब्राझील, जर्मनी, जापान आणि स्पेन सारख्या देशातून भाविक येत आहेत. यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर सनातन संस्कृतीच्या वाढत असलेल्या प्रभावाचे दर्शन होते.

महत्वाचे म्हणजे, पाकिस्तानसह अरबस्थानातील इस्लामिक देशही कुंभमेळ्यात रस घेत असल्याचे दिसत आहे. गुगल ट्रेंड्सनुसार, प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ इस्लामिक देशांमध्ये जबरदस्त सर्च होत आहे. कुंभमेळा सर्च करणाऱ्या देशांच्या यादीवर एक नजर टाकली असता पहिले नाव पाकिस्तानचे दिसते. येथील लोक कुंभमेळा आणि तेथे जमलेल्या लोकांसंदर्भात मोठ्या प्रमाणावर सर्च करत आहेत.



पाकिस्ताननंतर, कतार, यूएई आणि बहरीन सारखे देशही कुंभमेळ्यात रस घेताना दिसत आहेत. याशिवाय, नेपाळ, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, आयर्लंड, ब्रिटन, थायलंड आणि अमेरिकेसारख्या देशांतील लोकही कुंभमेळ्यासंदर्भात सर्च करत आहेत आणि वाचत आहेत.

**परदेशातील लोकही करतायत कुंभमेळ्यात स्नान**

कुंभमेळ्यात येणाऱ्या परदेशी यात्रेकरूंची वाढती संख्या लक्षात घेता, जगावर सनातन संस्कृतीचा प्रभाव वेगाने पडत असल्याचे दिसते. संगमात स्नान करणारे भारतीयच नाहीत, तर परदेशातून येणारे लाखो भाविकही या दिव्य अनुभवाचा भाग होत आहेत. संबंधित अहवालावरून दिसून येते की, २०२५ चा कुंभमेळा संपूर्ण जगाला पुन्हा एकदा भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि सनातन सभ्यतेचे, धर्माचे अद्भुत शक्तीचे दर्शन घडवत आहे.

**महाकुंभमेळ्यात ३.५० कोटी भाविकांनी केले अमृतस्नान**

जगातील सर्वात मोठे धार्मिक संमेलन असलेल्या महाकुंभमेळ्याच्या दुसऱ्या दिवशी मकरसंक्रांतीला विविध आखाड्यांच्या साधूसंतांनी त्रिवेणी संगमावर पहिले अमृतस्नान केले. या ठिकाणी मंगळवारी तब्बल ३.५० कोटी भाविकांनी स्नान केले. महाकुंभातील सर्वात पहिले पवित्र स्नान पौष पौर्णिमेच्या दिवशी पार पडले. विविध आखाडे तसेच हिंदू धर्मातील विविध संप्रदायातील लोकांनी मकरसंक्रांतीच्या दिवशी महाकुंभमेळ्यात स्नान केले. श्री पंचायती आखाडा महानिर्वाणी आणि श्री शंभु पंचायती अटल आखाड्याच्या सदस्यांनी सर्वात पहिल्यांदा अमृतस्नान केले.

## 'समृद्धी'वर खवय्यांची चंगळ १८ ठिकाणी होणार फूड कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी मुंबई**

समृद्धी महामार्गावर वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळ अर्थात 'एमएसआरडीसी'ने जागोजागी १८ फूड कोर्ट उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या फूड कोर्टच्या निविदांना ११ कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे आता प्रवाशांचे 'समृद्धी'वरील खायचे वांदे दूर होणार असून, खवय्यांची चंगळ होणार आहे. १८ पैकी तीन फूड कोर्ट ठाणे जिल्ह्यात राहणार आहेत.

६० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर महामार्गाच्या दोन्ही बाजूला हे फूड कोर्ट राहणार असून, यासाठी एमएसआरडीसीने दोन टप्प्यांत निविदा मागविल्या होत्या. गेल्यावर्षी मागविलेल्या निविदेत प्को इन्फ्राटेकने कंत्राट मिळवले होते; परंतु नंतर संबंधित कंपनी हवा तो निधी उभा करू शकली नसल्याने कंत्राट रद्द केल्याची माहिती सूत्रांनी



दिली. दोन टप्प्यांत मागविलेल्या या निविदांना पुढील ११ कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे. मात्र, प्रवाशांच्या पोटोबाची सोय झाली असली तरी पेट्रोल पंपांचा मुद्दा मात्र अद्याप कागदावरच आहे. यामुळे वाहनांमध्ये टाकी फुल्ल करूनच समृद्धीवरून प्रवास करावा लागणार आहे.

## भाजपासारखाच डाव आता काँग्रेसही खेळणार?

### 'या' राज्यात 'ऑपरेशन पंजा'नं राजकीय खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५बंगळुरू**

काँग्रेस शासित कर्नाटक राज्यात सध्या मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवरून काँग्रेसमधील नेत्यांमध्ये चढाओढ लागली आहे. त्यातच काँग्रेस चन्नगिरीचे आमदार शिवगंगा बसवराज यांनी केलेल्या भविष्यवाणीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जेडीएसचे ११ आमदार लवकरच काँग्रेसमध्ये सहभागी होतील असं शिवगंगा बसवराज यांनी म्हटलं आहे. कर्नाटकात जेडीएस विरोधी पक्षात आहे. त्यामुळे महाराष्ट्रात ज्यारितीने विरोधी पक्ष फुटला तसाच कर्नाटकात काँग्रेस त्यांचं सरकार आणखी मजबूत करण्यासाठी विरोधी पक्ष फोडणार अशी चर्चा सुरू आहे.



आमदार शिवगंगा बसवराज म्हणाले की, जेडीएसचे एकूण ११ आमदार काँग्रेसमध्ये लवकरच सहभागी होतील. डीके शिवकुमार पक्ष संघटनेत सगळ्यांना एकत्र आणत आहेत, ते दुसऱ्याला शक्य होईल का? बाकी लोक अशाप्रकारे अन्य पक्षातून नेते आणण्यास समक्ष नाहीत. काही लोकांना केवळ सत्ता हवी. काहीजण म्हणतायेत शिवकुमार यांना असं ऑपरेशन करू द्या मग आम्ही पाहू. ते केवळ आयत्या बिळावर नागोबा आहेत परंतु शिवकुमार काम करत राहतात असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय जे लोक संघर्ष करतात त्यांना चांगले दिवस येतात. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शिवकुमार यांच्या मार्गदर्शनात पोटनिवडणुकीत ३ जागा पटकावल्या असंही बसवराज यांनी म्हटलं तर काँग्रेसचं जेडीएस फोडण्याचं स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही. जेडीएस पक्ष समर्पित नेते आणि कार्यकर्त्यांना बनला आहे. कुमारस्वामी यांच्यामागे लाखो कार्यकर्ते आहेत. ते मजबुतीने पक्षाशी जोडलेले आहेत. पक्ष फोडणे अशक्य आहे असं जेडीएस प्रवक्त्यांनी दावा केला आहे.

## ...तर मोहन भागवतांना अटक केली असती; सरसंघचालकांच्या वक्तव्यावर संतापले राहुल गांधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**

राम मंदिर प्रतिष्ठापणेनंतरच देशात खऱ्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली गेल्याचे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. हिंदू तिथीनुसार राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला वर्ष पूर्ण झाल्याच्या प्रसंगी सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटलं. यानंतरआता लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी मोहन भागवत यांच्या स्वातंत्र्यावरील वक्तव्यावर जोरदार हल्ला चढवला. मोहन भागवत यांनी संविधानाचा अपमान केल्याचे राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.



काँग्रेसच्या नव्या कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी राहुल गांधी बोलत होते. यावेळी मोहन भागवत यांनी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावरुन केलेल्या विधानावर काँग्रेसचे राहुल गांधी यांनी त्यांच्यावर तीव्र हल्ला चढवला. मोहन भागवत यांनी संविधानावर हल्ला केला आहे. हा देशद्रोह आणि संविधानाचा अपमान आहे, असं राहुल गांधी म्हणाले. निवडणूक पारदर्शकतेने पार पाडणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. महाराष्ट्र, हरियाणा निवडणुकीची आकडेवारी देण्याची जबाबदारी आयोगाची आहे, मात्र ते आम्हाला डेटा देण्यास नकार देत आहेत, असंही राहुल गांधी म्हणाले.

**मोहन भागवतांवर कारवाई झाली असती – राहुल गांधी**

मला वाटते की कालच संघ प्रमुखांनी १९४७ मध्ये भारताला कधीच स्वातंत्र्य मिळाले नाही असं म्हणणं हे अगदी प्रतीकात्मक आहे. ते म्हणाले की, खरे स्वातंत्र्य राम मंदिर बांधले तेव्हाच मिळाले. मोहन भागवत यांनी काल संविधान आपल्या स्वातंत्र्याचे प्रतिक नसल्याचे सांगतानाच त्यावर हल्ला चढवला. मोहन भागवत यांनी स्वातंत्र्य चळवळ आणि राज्यघटनेबद्दल आपले मत राष्ट्राला सांगण्याची हिंमत केली. ते काल जे बोलले ते देशद्रोह आहे कारण ते म्हणाले आमची राज्यघटना अवैध आहे. हा आपल्या देशाचा आणि प्रत्येक भारतीयाच्या स्वातंत्र्याचा अपमान आहे. हे विधान इतर कोणत्याही देशात केले असते तर भागवतांना अटक करून न्यायालयीन कारवाई झाली असती. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले नाही असे म्हणणे हा प्रत्येक भारतीयाचा अपमान आहे. आणि आपण हे ऐकणे बंद केले पाहिजे, असं राहुल गांधी म्हणाले.

## वाल्मिक कराडला ७ दिवसांची कोठडी : बीड कोर्टाबाहेर राडा; निदर्शने, घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ बीड**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाच्या चौकशीसाठी वाल्मिक कराडच्या (थरश्राळज्ञ घरीरव) पोलीस कोठडीची मागणी एसआयटी पथकाने केली होती. त्यानुसार, बीड सत्र न्यायलायाने मकोका गुन्ह्यातील आरोपी वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यानंतर, आरोपी कराडला कोर्टातून पोलीस व्हॅनमध्ये नेत असताना कोर्टाबाहेर चांगलाच राडा पाहायला मिळाला. वाल्मिक कराडच्या समर्थनार्थ अनेकांनी घोषणाबाजी केली, तर काहींनी वाल्मिक कराडला विरोधाही घोषणाबाजी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या महिला कार्यकर्त्या अॅड. हेमा पिंपळे यांनी घोषणाबाजी करत गृहमंत्र्यांनी बीड जिल्ह्यात यावं, असं म्हटलं. तर, काही




वकिलांनीही संविधानाचा दाखला देत वाल्मिक कराडवर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल करण्यात आल्याचं म्हटलंय. त्यामुळे, बीडच्या कोर्टाबाहेरच राडा पाहायला मिळाला.

बीड सत्र न्यायालयाने वाल्किम कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली असून २२ जानेवारीपर्यंत पीसीआर देण्यात आली आहे. न्यायालयातील सुनावणीनंतर एसआयटी पथकाने वाल्मिक कराडला न्यायालयातून बाहेर आणल्यानंतर कोर्टाबाहेर राडा झाल्याचं पाहायला मिळालं. कोर्टाबाहेर वकिलांचेच दोन गट दिसून आले, त्यापैकी एका महिला वकिलाने वाल्मिक कराडवर आरोप करत फाशीची शिक्षा द्या म्हणत घोषणाबाजी केली. तर, एका वकिलाने वाल्मिक कराड यांच्यावर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल केल्याचं म्हणत त्यांचे समर्थन केले, तसेच आंदोलनाच्या माध्यमातून दबाव टाकला जात असल्याचं म्हटलं. त्यानंतर, पोलीस व इतर सुरक्षा रक्षकांनी संबंधित आंदोलकांना ताब्यात घेतल्याचं पाहायला मिळालं.

## ऐन निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत वाढ

### केजरीवाल यांच्यावर खटला चालवण्यास केंद्रीय गृह मंत्रालयाने दिली मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**

दिल्लीत विधानसभा निवडणुकीची धामधुमी सुरू असताना माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. दिल्ली दारू धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात आम आदमी पक्षाचे (आप) प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्यावर खटला चालवण्यास केंद्रीय गृह मंत्रालयाने अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) मंजुरी दिली आहे. एका वृत्तपत्राने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.




**ईडीची आधी नायब राज्यपालांना विनंती**

दिल्लीचे नायब राज्यपाल व्हीके सक्सेना यांनी दिल्लीच्या माजी मुख्यमंत्र्यांवर खटला चालवण्यास होकार दिल्यानंतर मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२४ मध्ये दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, लोकसेवकांवर खटला चालवण्यापूर्वी ईडीला पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. पुढील महिन्यात, तपास एजन्सीने व्हीके सक्सेना यांना पत्र लिहून सांगितले की, केजरीवाल हे घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार असल्याने मंजुरी दिली जावी.

## पोलीस व्हॅनमध्ये बसताना वाल्मीक कराडने आवाज दिलेला रोहित कोण?, सुरेश धसांनी सगळंच सांगितलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ बीड**

पवन चक्की कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणातील संशयीत आरोपी वाल्मीक कराड याच्याविरोधात काल मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. काल कराड याला न्यायालयात दाखल करण्यात आले होते, यानंतर न्यायालयातून रुग्णालयात तपासणीसाठी हजर करण्यात आले. यानंतर रुग्णालयातून बाहेर पडत असताना वाल्मीक कराड याने रोहित कुठे आहे? , असा प्रश्न केला. याबाबतचा एक व्हिडीओ सोशल




मीडियावर व्हायरल झाला आहे. अनेकांनी हा रोहित आहे तरी कोण असे प्रश्न उपस्थित केले, यावर आता भाजपा आमदार सुरेश धस यांनी उत्तर दिले आहे.

काल न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर कराड याला रुग्णालयात तपासणीसाठी आणण्यात आले. यावेळी रुग्णालया बाहेर वाल्मीक कराड याच्या समर्थकांनी गर्दी केली होती, यावेळी पोलिसांची संरक्षण मोठ्या प्रमाणात होते. पोलीस व्हॅनमध्ये बसत असताना वाल्मीक कराड याने रोहित कुठे आहे?, असा प्रश्न केला. यावेळी पोलिसांनीही रोहित कुठे आहे, असं म्हणत बोलवायला सुरूवात केली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

## संपादकीय ......

# तिळगूळ द्याच..!

महाराष्ट्रामध्ये सुरू असलेल्या हाणामारीच्या, मारामारीच्या घटना पाहता राज्यभरात सर्वांनी एकमेकांना तिळगूळ देणे आवश्यक झाले आहे यात शंका नाही. राज्यात आदर्श राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण काही अडेलतट्टू लोक स्वतःची भाषा भाषा सोडायला तयार नाहीत. महाराष्ट्राची राजकीय संस्कृती कशी बरबाद होईल याचा पुरेपूर प्रयत्न करत आहे. खरे तर त्यांच्या स्वतःच्या पक्षाने त्यांच्या वजनाइतके तिळगुळ गोरगरिबांना वाटले तरी काही फरक पडेल असे वाटत नाही. सौहार्द निर्माण करण्यासाठी आपल्या संस्कृतीमध्ये संक्रांतीचा सण आहे. मंडळी, या संक्रांतीच्या तुम्हा सर्वांना शुभेच्छा आणि भेटेल त्याला तुम्हीही त्या द्याव्यात ही आमची आग्रहाची विनंती आहे.

राजकीय मंडळी वक्तव्य करताना भलतीच विधाने करून राजकीय संस्कृती बिघडवत आहेत. त्यांनीही एकमेकांना भरभरून तिळगूळ द्यायला हरकत नाही. सत्ताधारी पक्षाचे बरे चाललेले विरोधी पक्षांना बघवत नाही. त्यामुळे ते सातत्याने टीकेचे प्रहार करत असतात. हे टाळण्यासाठी सत्ताधारी पक्षाने जास्तीत जास्त जहरी टीका करणार्या नेत्याच्या घरी जाऊन तिळगुळाच्या लाडूंची मोठी पिशवीच भरून द्यायला पाहिजे. पुढे जेव्हा टीका करण्याची वेळ येईल तेव्हा त्या राजकीय नेत्याने आपल्याला तिळगूळ दिला होता याची आठवण होऊन टीकेची धार कमी होऊ शकते हे निश्चित.

मंडळी, जगाचे जे काय व्हायचे ते होईल. परंतु कुटुंब संस्थेमध्ये आजकाल विसंवाद आणि वाद वाढले आहेत. संक्रांतीचे निमित्त साधून सर्वात आधी आपल्या घरातील प्रत्येक सदस्याला तिळगूळ द्या. विशेषत: पतीने पत्नीला आणि पत्नीने पतीला मनापासून तिळगूळ दिले पाहिजेत. या दोघांमधील संवाद गोड राहील, बोलणे गोड होईल तर कुटुंबामध्ये शांतता राहील. आधी आपले घर शांत असले पाहिजे. तरच त्या घरातील व्यक्ती कर्तृत्व करू शकतात. यासाठी आधी घरी भरपूर तिळगूळ द्या. वाढत्या वयाचा मुलगा किंवा मुलगी असेल तर त्याला किंवा तिला उद्याची संधी साधून तीन ते चार वेळा तिळगूळ द्या. असे केले तर किमान महिनाभर तरी तुमच्या प्रत्येक बोलण्याला उलट उत्तर येणार नाही, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने' असे म्हणणार्या संत तुकारामांची शिकवण आपल्याला आहे. प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारात किरकोळ निमित्त होऊन 'अरे'ला 'का रे' होते आणि शब्दांवरून सुरू झालेली वादावादी मुद्द्यावरून गुद्द्यावर येते. यासाठी सर्वात प्रथम म्हणजे प्रत्येकाने गोड बोलले पाहिजे. तीळ आणि गुळातला गोडवा जर खरोखरच जिभेवर उतरला तर जगण्याचा उत्सव होऊ शकतो आणि जगाचे नंदनवन होऊ शकते. तिळगुळाचा गोडवा शब्दांच्या माध्यमातून जिभेवर आला पाहिजे आणि जिभेवरून तो अंत:करणात रुजला पाहिजे. तरच जगणे सुखकर होऊ शकते.

दैनंदिन शांतता डिस्टर्ब करायला शेजारी अत्यंत महत्त्वाचे असतात. शेजार्याबरोबर कचरा टाकण्यापासून ते डॉल्बीवर गाणे लावण्यापर्यंत परस्परांशी वाद असतात. हे वाद टाळण्यासाठी सुहास्य वादनाने तिळगूळ घेऊन जा आणि भरपूर तिळगूळ देऊन गोड बोलण्याची विनंती करा. लोक परस्परांशी जेवढे गोड बोलतील, तेवढा विसंवाद कमी होत जाईल आणि जेवढा विसंवाद कमी होईल, तेवढा समाज शांतताप्रिय होत जाईल.

# आंब्यातील फळमाशीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करा एकदम कमी खर्चाचा सोपा




**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

फळमाशी ही कीड असून सर्व वेलवर्गीय फळभाज्या तसेच फळांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करते. आंबा पिकात या माशीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होतो यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे आहे.

**फळमाशीची ओळख**

– फळमाशीच्या जीवनक्रमात अंडी, अळी, कोष व माशी, अशा चार अवस्था असतात.

– किडीची माशी आकाराने घरमाशीएवढी असते.

– तिचे पंख तपकिरी रंगाचे असून छातीवर पिवळसर पोपटी रंगाचे अर्धगोलाकार पट्टे असतात.

– फळमाशीची अंडी पांढरी, एक मि.मी. लांबीची असतात.

– अळ्या पाठीमागच्या बाजूस निमुळत्या व रंगाने पिवळसर असून, त्यांना पाय नसतात.

– कोष दोन्ही बाजूस निमुळते व रंगाने पिवळसर तांबूस असतात.

**नुकसान करण्याची पद्धत**

– फळमाशीची मादी तिच्या टोकदार अंडनलिकेच्या साहाय्याने फळांच्या सालीखाली छिद्रे पाडून अंडी घालते.

– एका छिद्रात एक ते पंधरा अंडी असू शकतात.

– एक मादी एका महिन्याच्या कालावधीमध्ये सुमारे २०० अंडी घालते.

– बाहेर पडलेल्या अळ्या फळातील गर खातात. त्यामुळे किडलेली फळे गळून पडतात.

– काही वेळेला मादीने अंडी घालण्यासाठी पाडलेल्या छिद्रातून फळात सूक्ष्म जंतूंचा शिरकाव होतो आणि त्यामुळे संपूर्ण फळे सडून जातात.

विदर्भ प्रजासत्ताक विशेष कृषी

– अळ्यांची वाढ हवामानानुसार सुमारे एक ते तीन आठवड्यांत पूर्ण होते.

– पूर्ण वाढलेल्या अळ्या फळाला छिद्रे पाडून त्यातून बाहेर पडतात आणि परत अंडी घालण्यास सुरुवात करतात.

– हवामानानुसार फळमाशीच्या अनेक पिढ्या वर्षभरात होत असतात. त्यामुळे फळभाज्यांचे ३० ते ६० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान होते.

– फळमाशीमुळे किडलेली फळे पूर्ण वाढ न होता गळून पडतात. काही फळे वेडीवाकडी वाढतात व गळून पडतात.

– आंबा किंवा पेरूची किडलेली फळे बाहेरून चांगली दिसत असली तरी त्यामध्ये अळ्या असून, गराला एक प्रकाराचा उग्र वास येतो.

रक्षक सापळ्याचा प्रभावी वापर ठज्ञीहरज्ञ डश्रिर

१) फळमाशीवर रासायनिक कीटकनाशकांच्या फवारणीद्वारे नियंत्रण करणे अवघड आहे. कारण अळ्या फळांच्या आत असतात.

२) फळमाशी नियंत्रणासाठी रक्षक सापळा फायदेशीर ठरत आहे.

३) फळमाशांना आकर्षित करण्यासाठी 'मिथाइल युजेनॉल' किंवा 'क्यू लुअर' हे रासायनिक द्रव्ये ठेवावे लागतात.

४) 'मिथाइल युजेनॉल' हे एका वेळेला साधारणत २ ते ३ मि. लि. एवढेच वापरावे लागते.

५) फळमाश्यांचा प्रादुर्भाव असेल अशा ठिकाणी सापळा ठेवावा.

**सापळा ठेवण्याची पद्धत**

१) फळबागेत हा सापळा जमिनीपासून एक ते दोन फूट उंचीवर असावा.

२) आंब्याच्या बागेमध्ये झाडांच्या उंचीप्रमाणे साधारण जमिनीवरून दोन ते तीन मीटर उंचीवर राहील, असा टांगावा.

३) सापळा टांगता येणे जरूरीचे आहे. तो जमिनीवर किंवा उंच मचणावर ठेवू नये.

४) सापळा शक्यतो बागेच्या पूर्व बाजूस टांगावा.

५) मोठ्या क्षेत्रावर बाग असल्यास साधारण एका हेक्टर जागेसाठी चार सापळे वापरावेत.

# म.न.पा.शाळा जेवड येथील विद्यार्थ्यांची राष्ट्रपती भवनास भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अमरावती** – मनपा शाळा जेवड ही शाळा एक उपक्रमशील शाळा म्हणून आपला वेगळा ठसा निर्माण करते. या शाळेमध्ये अनेक उपक्रम होत असतात असाच एक सहशालेय उपक्रम म्हणजे शैक्षणिक सहल. दरवर्षी राज्याच्या बाहेर सहल काढण्याची परंपरा राखत याही वर्षी मनपा शाळा जेवड ची शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांकडून अतिशय अल्प शुल्क आकारून दिल्ली येथे काढण्यात आली. दिल्ली हे भारताच्या राजधानीचे शहर असून या ठिकाणी अनेक ऐतिहासिक वास्तू व स्थळं आहेत. त्या सर्व स्थळांना भेट देण्याचा आनंद मनपा शाळा जेवड शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला. यामध्ये अखिल भारतीय युद्ध स्मारक म्हणजेच इंडिया गेट आणि आता हल्ली ज्याचं नाव भारत माता द्वार असं केलेलं आहे या स्थळाला भेट दिली.

याविषयी माहिती घेताना भारतीय सैनिकांविषयी गर्व वाटला व अभिमानाने सर्व विद्यार्थी नतमस्तक झाले. मुघल सम्राट शहाजहान यांच्या काळात निर्माण झालेल्या लाल किल्ला या ऐतिहासिक ठिकाणास विद्यार्थ्यांनी भेट दिली. लाल किल्ल्याची भव्य दिव्य वास्तु पाहून विद्यार्थी अचंभित झाले. दिल्लीमध्ये यमुना नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची समाधी आहे. ती राजघाट म्हणून प्रसिद्ध आहे सर्व विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीच्या समाधी समोर मौन श्रद्धांजली अर्पण करून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना विनम्र अभिवादन केले. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतींना विद्यार्थ्यांनी उजाळा दिला.

या सर्व सहली दरम्यान सर्वात महत्त्वाचे आकर्षण होते ते म्हणजे राष्ट्रपती भवन! राष्ट्रपती भवनाची भव्य दिव्य इमारत पाहूनच विद्यार्थ्यांच्या मनात या वास्तू विषयी उत्सुकता निर्माण झाली. आमच्या सोबत असलेल्या गाईड यांनी राष्ट्रपती भवनाच्या सर्व दालनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली भूतपूर्व सर्व राष्ट्रपतींच्या नावाने असलेले दालने विद्यार्थ्यांना अगदी जवळून पाहता आले. हल्लीच महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या साठी निर्माण केलेलं भारतातील सर्व आदिवासी जनजातींच्या कलाकृतींचं हे दालन सर्व दालनांमध्ये आकर्षक आहे. विश्वविख्यात ताजमहालचा सौंदर्य हे तर वर्णनात येत आहेत या वास्तूला भेट देताना अद्वितीय असलेलं हे शिल्प डोळ्यात विद्यार्थ्यांनी डोळ्यात साठवून घेतले

याशिवाय दिल्लीमध्ये कुतुब मिनार ,अक्षरधाम, लोटस टेम्पल, बिर्ला मंदिर या सर्व वास्तूंना भेट देत मथुरा व वृंदावन या ऐतिहासिक तथा अध्यात्मिक स्थळांना देखील भेट देण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी लुटला.य या सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी दिल्लीमधील मेट्रोचा आनंद घेतला. तसेच दिल्लीमधील मोठमोठ्या बाजारपेठांमध्ये शॉपिंगचा सुद्धा आनंद घेता आला.या सहलीमध्ये मुख्याध्यापिका सौ वंदना सावजी, श्री प्रशांत नालसे, श्री शिरीष फसाटे, श्रीमती शीला डांगे,सौ.सीमा शिरभाते, कु.किरण नालिंदे, कु.वैशाली बुटे,कु.पुष्पा कोरडे,कु.सोनाली चापके सौ.हर्षा दिवे, श्री भुषण वाघ सहभागी झाले

# चंद्रशेखर बावनकुळे होणार अमरावतीचे पालकमंत्री



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती** – प्रथम नेता निवडीला उशीर, नंतर मंत्रीपद वाटपाचा घोळ,मंत्रीमंडळाचा शपथविधी झाल्यावर खातेवाटपाला विलंब आणि आता खातेवाटप झाल्यावर पालकमंत्री ठरवण्यावरून वाद अशी महायुती सरकारची आतापर्यंतची वाटचाल राहिली आहे. अशात दोन दिवसात पालकमंत्री वाटपाचा घोळ संपण्याचे संकेत आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अमरावतीचे पालकमंत्री होणार असल्याची माहिती समोर येऊ लागली आहे.पालकमंत्री ठरवण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. घटक पक्षांशी चर्चा करून पालकमंत्री ठरवावे, असे फडणवीस यांनी सांगितले होते. त्यालाही दोन आठवडे झाले. मात्र अद्याप अमरावतीसह एकाही जिल्ह्याला पालकमंत्री मिळाला नाही. यावरून या मुद्यावरून महायुतीत वाद आहे, असे स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांना नागपूर येथे पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले, १५, १६ तारखेपर्यंत पालकमंत्री पदाचा विषय सुटलेला असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा, एकनाथ शिंदे यांच्यासोबत दोन– तीन बैठकी झालेल्या आहेत. पालकमंत्री पदाचे वाटप अंतिम एप्प्यात आहे, असे बावनकुळे म्हणाले.

### २४ ला घेणार डीपीसीची बैठक

अमरावतीचे संभाव्य पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे येत्या २४ तारखेला अमरावती जिल्हा नियोजन समितीची बैठक घेणार आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच नियोजनपूर्व बैठक घेतलेली आहे. मुख्यमंत्र्यांनी प्रजासत्ताक दिनापूर्वीच सनदी अधिकाऱ्यांचे स्थानांतर केलेले आहेत. आता केवळ पालकमंत्री पदाचे वाटप हा विषय शिल्लक राहिलेला आहे. तोसुद्धा दोन– तीन दिवसांत निकाली निघणार आहे.




# ब्रेकफास्ट मध्ये करा या पाच पदार्थांचा समावेश अन् आजारांपासून राहा कोसो दूर

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

आज आम्ही तुम्हाला पोषक आहार ब्रेकफास्टच्या माध्यमातून मिळावा, यासाठी काही टिप्स सांगणार आहोत. ब्रेकफास्ट किंवा नाश्ता हे दिवसाचे पहिले जेवण आहे. यामध्ये आपण काय खाता यावर आपल्या संपूर्ण दिवसाचे आरोग्य अवलंबून असते. अशावेळी नाश्त्यात खाण्यासाठी लागणारे पदार्थ अत्यंत काळजीपूर्वक निवडणे गरजेचे आहे.विशेषत: जेव्हा आपण कोणत्या प्रकारच्या वैद्यकीय स्थितीचा सामना करत असाल. निरोगी नाश्ता शरीराला योग्य ऊर्जा तर देतोच, शिवाय शारीरिक आणि मानसिकदृष्ट्याही तयार करतो. अशातच येथे आम्ही तुम्हाला काही हेल्दी फूड्सबद्दल सांगत आहोत जे तुम्ही तुमच्या ब्रेकफास्टचा भाग बनवू शकता. जाणून घेऊया.

**ओट्स** ओट्स हा ब्रेकफास्टचा उत्तम पर्याय आहे. त्यामध्ये फायबर, प्रथिने जास्त प्रमाणात असणे असे विविध आवश्यक पोषक घटक असतात. ओट्स खाल्ल्याने बराच वेळ भूक लागत नाही आणि कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहण्यास ही मदत होते. आपण ओट्स दूध किंवा पाण्यात शिजवू शकता आणि त्यांना फळे आणि शेंगदाण्यांमध्ये मिसळू शकता.

**दही**– दही हे प्रथिने आणि कॅल्शियमयुक्त अन्न आहे. हे पोटासाठी देखील फायदेशीर आहे, कारण यात प्रोबायोटिक्स असतात, जे पचनास मदत करतात. चवदार आणि पौष्टिक स्नॅक बनविण्यासाठी आपण फळे, शेंगदाणे किंवा ओट्ससह दही मिसळू शकता.

**फळे**– सकाळी लवकर फळांचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. सफरचंद, केळी, संत्री आणि बेरी सारख्या फळांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. अशावेळी तुम्ही फळ साध्या किंवा कोशिंबीर म्हणूनही खाऊ शकता.

**अंडी**– अंडी प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्त्रोत आहेत आणि नाश्त्यात त्यांचा समावेश करणे



खूप फायदेशीर ठरू शकते. अंड्यात सर्व आवश्यक अमिनो ॲसिड असतात, जे शरीराच्या स्नायूंसाठी आवश्यक असतात. अंडी उकडून, ऑमलेट बनवून किंवा भाज्यांबरोबर परतून तुम्ही खाऊ शकता. मधुमेहाचे रुग्णही याचे सेवन करू शकतात.

**शेंगदाणे, बदाम, अक्रोड**– बदाम, अक्रोड, चिया बियाणे आणि फ्लॅक्स सीड्स नाश्त्यासाठी चांगले आहेत. त्यामध्ये फॅट, प्रथिने आणि फायबर असतात, जे आपल्याला दीर्घकाळ तृप्त ठेवतात. आपण त्यांना दही, ओट्स किंवा एकट्यासारखे स्नॅक म्हणून खाऊ शकता.( या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# वीस गुंठे उसातल्या मिरचीने या शेतकऱ्याला केले लखपती




**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

कसबा सांगाव येथील सुकुमार विश्वनाथ स्वामी हा शेतकरी आपल्या मिरचीच्या पिकातून लखपती झाला आहे. २० गुंठे शेतीमध्येमिरचीसह मिश्र पिके, तसेच उसाची लागवड करून आर्थिक प्रगती साधत आहे.

स्वामी यांची ३० गुंठे जमीन आहे त्यापैकी २० गुंठ्यांत ऑगस्टमध्ये 'शकिरा' वाणाच्या मिरचीची लागवड केली. सरींमधील अंतर चार फूट, दोन झाडांतील अंतर तीन फूट ठेवले.

सरासरी २२०० मिरची रोपे लावली. गत पाच महिन्यांपासून त्यांचे मिरचीचे उत्पादन सुरू आहे. आतापर्यंत त्यांनी २ टनांपेक्षा जास्त ओली मिरची जवळपासच्या बाजारावर विक्री केली आहे.

किलोमागे साठ ते शंभर रुपये दर मिळाला. सरासरी ६० रुपये दर धरला तरी २ टनांचे १ लाख २० हजार रुपये आतापर्यंत मिळाले आहेत.जूनमध्ये शेताची उभी–आडवी नांगरट केली. नंतर रोटर मारून चार फुटी सरी सोडली. धनलक्ष्मी भुईमुगाची टोकण केली. सप्टेंबरअखेरीस सुमारे दहा पोती भुईमुगाचे उत्पन्न घेतले.भुईमूग काढून ८६०३२ या ऊस बियाणाची लागवड केली. त्याचे अपेक्षित उत्पन्न ४० टन आहे. आत्ताच्या दराप्रमाणे ३१०० रुपये टन याप्रमाणे १ लाख २४ हजार रुपये उत्पन्न मिळणार आहे.२० गुंठ्यांत ३ लाख ५१ हजार सरासरी उत्पन्नातून मशागत १० हजार ५ ट्रॉली शेणखत १५ हजार, मजुरी १० हजार खते व पाणी ५ हजार असा खर्च धरला तरी वर्षभरात या वीस गुंठ्यांमधून ३ लाखांचे उत्पन्न मिळणार आहे.सुकुमार यांनी शेती मशागतीत आई सुशीला विश्वनाथ स्वामी व पत्नी कल्याणी यांची साथ लाभली. त्यामुळेच आपण मिरचीतून लाखाचे उत्पन्न घेऊ शकलो असे त्यांनी सांगितले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १५ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


## पोलीस आयुक्तालयातील ४०२ प्रलंबित अर्ज निकाली

### १६ जानेवारी पर्यंत सुरू राहणार कार्यशाळा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी पोलिस ठाण्यातील नागरिकांच्या प्रलंबीत तक्रारी तातडीने निकाली काढण्यासाठी वसंत हॉल येथे १३ जानेवारी पासून तक्रार निवारण कार्यशाळा सुरू केली होती. आज १४ जानेवारी रोजी तक्रार निवारण कार्यशाळेत एकूण ४०२ प्रलंबीत अर्ज म्हणजे तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. ही कार्यशाळा १६ जानेवारी पर्यंत सुरू राहणार असून आगामी दोन दिवसांमध्ये शेकडो तक्रारीं निकाली निघण्याची शक्यता आहे.

शहरातील नागरिक पोलिस ठाण्यात किंवा पोलिस आयुक्तालयातील आवक जावकमध्ये तक्रारी करतात. बहुतांश जण – सीपींना भेटून त्याच्याकडे तक्रारी करतात. अशा तक्रारी पत्रव्यवहार शाखे मार्फत संबधीत पोलिस ठाण्यात जातात. दरम्यानपोलिस ठाण्यांमध्ये दैनंदिन कामकाज, बंदोबस्त, तपास, आरोपींची शोध अशा अनेक कारणांमुळे तक्रार अर्ज पेडींग राहत असल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप होतो. त्यामुळे सीपी रेड्डी यांनी स्वतः वसंत हॉल येथे नागरिकांसाठी १३ जे १६ जानेवारी दरम्यानतक्रार निवारण कार्यशाळा सुरू केली. हॉलमध्ये दहा पोलिस ठाण्यांसह वाहतुक पोलिस व इतर शाखांचे टेबल लावण्यात आले.एका दिवशी एकाच वेळी दहाही पोलिस ठाण्यातील प्रलंबीत अर्जावर सीपींच्या निगरानीमध्ये कारवाई होत असल्याने अनेक अर्ज निकाली निघत आहे. त्यानुसार आज विशेष कार्यशाळेत आयुक्तालयातील एकूण ४०२ प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात आले. ही कार्यशाळा १६ जानेवारी पर्यंत सुरू राहणार असून नागरिकांना त्यांनी केलेल्या तक्रारीची माहिती हवी असल्यास वसंत हॉलमध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सीपी रेड्डी यांनी केले आहे.

## आजपासून मोर्शी तालुक्यात शासकीय कापूस खरेदी केंद्र होणार सुरू !

### विविध मान्यवरांच्या हस्ते कापूस खरेदी केंद्राचे आज होणार उद्घाटन !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५दापोरी–** मोर्शी तालुक्यात दापोरी हिवरखेड परिसरामध्ये शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी कापूस उत्पादक शेतकऱ्यांतर्फे करण्यात आली होती परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन आजपासून दापोरी हिवरखेड परिसरामध्ये पांडव जिनिंग प्रेसिंग इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड कंपनी येथे सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात येत आहेत. या खरेदी केंद्रांवर शासनाने कापसासाठी जो काही हमीभाव जाहीर केला आहे त्यानुसार खरेदी करण्यात येत असल्यामुळे नक्कीच यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होत आहे. मोर्शी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात कपाशीचे लागवड होते. परंतु जर आपण यावर्षी कापसाची स्थिती बघितली तर अत्यंत कमी दर मिळत असल्याने कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. राज्यामध्ये अनेक ठिकाणी शासकीय हमीभावापेक्षा देखील कमी दराने खाजगी व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदी केला जात असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. परंतु आता मोर्शी तालुक्यात दापोरी हिवरखेड



परिसरामध्ये शासकीय सीसीआय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमधून आता आनंद व्यक्त केला जात आहे.मोर्शी तालुक्यातील अनेक गावांच्या परिसरात कपाशीची लागवड खूप मोठ्या प्रमाणावर होते व यावर्षी कपाशीचे पीक चांगले आले असताना खाजगी व्यापाऱ्यांच्या माध्यमातून मात्र शासकीय हमीभावापेक्षा देखील कमी दराने कापूस खरेदी केला जात असल्याने शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका सहन करावा लागत होता. परंतु आता शासकीय हमीभाव केंद्र सुरू केल्यामुळे खाजगी कापूस खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून देखील कापसाच्या दरात निश्चित वाढ केली जाईल अशी एक शक्यता आहे. दापोरी परिसरामध्ये सीसीआय अंतर्गत कापसाचे खरेदी केंद्र सुरू केल्यामुळे तालुक्यातील जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून आज १५ जानेवारी रोजी वर्धा लोकसभा मतदार संघाचे खासदार अमर काळे, अमरावती लोकसभा मतदार संघाचे खासदार बळवंत वानखडे, आमदार उमेश यावलकर, माजी आमदार यशोमती ठाकूर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन ठोके, उपसभापती संजयतत्ते, गिरीश पांडव, दिलीप कांबळे, रुपेश नंदनवार, लाभेष लोखितकर, संजय पांडव, परिसरातील शेतकरी यांच्यासह आदी मंडळींच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.–

## नायलॉन मांजाने गळा चिरला इलेक्ट्रिशियनचा मृत्यू, ६ जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अकोला**



नायलॉन मांजाने एका दुचाकी चालकाचा गळा कापला. प्रचंड रक्तस्त्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना पोलिस अधीक्षक कार्यालयासमोरील एनसीसी कार्यालयासमोर मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजता दरम्यान घडली.

किरण प्रकाश सोनोने, रा. मोठी उमरी असे मृतकाचे नाव असून, ते इलेक्ट्रिशियनचे काम करत होते. त्यांना दोन लहान मुले आहेत. दुचाकी चालक सोनोने हे दक्षता नगर अर्थात नवीन पोलिस वसाहती जवळून उड्डाणपुलावर चढले होते. एनसीसी ऑफिसजवळ पुलावरून उतरत असताना त्यांच्या गळ्यात मांजा अडकला. उतार असल्याने कदाचित वाहन नियंत्रणात आले नसावे. त्यामुळे काही कळण्याच्या आतच मांजा गळ्याला अडकल्याने त्यांचा गळा चिरला. त्यानंतर ते खाली कोसळले. प्रचंड रक्तस्त्राव झाला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच खदान पोलिस ठाण्याचे ठाणेदार मनोज केदारे, पोलिस हेडकॉन्स्टेबल दिनकर धुरंधर, अमित दुबे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पंचनामा करुन आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

दरम्यान मकर संक्रांतीच्या दिवशी नायलॉन मांजाने अकोला शहरातील दादाराव, शिलोक, सुमित हे तिघे जखमी झाले आहेत. तर ग्रामीणमधील तिघे जखमी झाले आहेत. त्यात कुणाच्या पायाला तर कुणाच्या डोळ्याला, हाताला इजा झाली आहे.

## मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचा उत्कृष्ट इनोव्हेटर पुरस्कार डॉ. अनिता पाटील यांना जाहीर

### कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याहस्ते सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती –**

मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडिया, कराड येथील कृष्णा विश्व विद्यापीठाच्या कृष्णा इन्स्टिटच्यूट ऑफ अलाईड सायन्सेस व यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद – २०२५ च्या वतीने देण्यात येणारा मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचा उत्कृष्ट इनोव्हेटर पुरस्कार हा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रा.डॉ.अनिता पाटील यांना जाहीर करण्यात आल्याबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार केला. यावेळी प्र–कुलगुरू डॉ.



महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, जीवतंत्रशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रसाद वाडेगांवकर, डॉ. प्रशांत ठाकरे, डॉ. सुदर्शन कोवे, इन्क्युबेशन प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी यावेळी उपस्थित होते.

संशोधन क्षेत्रातील त्यांच्या अपवादात्मक योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराची निवड करताना संपूर्ण भारतातील वेगवेगळ्या संशोधकाच्या सादरीकरण परिक्षणानंतर ही निवड करण्यात आली आहे.

प्रा. डॉ. अनिता पाटील यांनी संशोधनाच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या नावे पाच पेटंट असून त्यांची तीन पुस्तके, ५९ शोध निबंध, १५ पुस्तकातील प्रकरणे, १० शोध प्रकल्प आणि १५ इतर शोध निबंध प्रकाशित आहेत. तसेच त्या एम. फिल. आणि पीएचडी च्या संशोधन मार्गदर्शक असून आजवर त्यांच्या मार्गदर्शनात १० संशोधक विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी तर ०२ संशोधक विद्यार्थ्यांनी एम. फिल पदवी संपादन केली आहे.त्यांच्या या संशोधन कार्याचा गौरव म्हणून संशोधन क्षेत्रातील मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटीचा उत्कृष्ट इनोव्हेटर पुरस्कार हा मान्यवरांच्या हस्ते त्यांना १९ जानेवारी,२०२५ रोजी सातारा येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रदान करण्यात येणार आहे. यांच्या या यशाबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र – कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, मायक्रोबायोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, जीवतंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## मालमत्ता कर आकारणीत महापालिकेचा भेदभाव

### महानगर चेम्बर अध्यक्ष सुरेश जैन यांचे आयुक्तांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

महानगरपालिके द्वारे स्वतःच्या व्यावसायिक वापराच्या इमारतींना ९ रुपये प्रति चौरस फूट – दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते. तिच इमारत जर भाडे तत्वावर दिली तर वार्षीक भाड्याच्या रकमेतून १० टक्के वजा करुन त्यावर ५६ टक्के मालमत्ता कर आकारणी केली जाते. त्यावर १८ टक्के जीएसटी, १० टक्के आयकर टीडीएस व ५ टक्के जीएसटी टीडीएस आकारला जाते. मालमत्ता कर आकारणीत हा भेदभाव असल्याचे सांगत यासंदर्भात महानगर चेम्बर अध्यक्ष सुरेश जैन यांनी मनपा आयुक्ताला भेटून निवेदन दिले.

संपत्ती कराची आकारणी अवाजवी आहे. मालमत्ता कराचे दर अन्यायकारक प्रकारच्या कर आहे. अशा आकारणीने व्यावसायिक इमारत मालकास भाडे रूपातील रकमेने काहीच बचत होत नाही. या अवास्तविक दरामुळे शहरातील ५० टक्के बिल्डिंग ओसाड पडल्या आहेत. पर्यायाने बरेच ठिकाणी ही माहिती लपवून ठेवण्यात येते. त्यामुळे मनपाचेसुद्धा आर्थीक नुकसान होते. सामान्यतः भाड्याने व्यावसायिक गाळे घेणाऱ्या कंपन्या वेगवेगळ्या आस्थापना या बाहेरगाव, बाहेर राज्यातील असतात. आपल्याकडील ही उच्चदाराची करपद्धती बघून ते इमारती भाड्याने घेण्यास अनुत्सुक असतात. यामुळे अमरावती शहरातील रहिवाश्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या शहरात येणारा पैसा पर्यायाने कररूपी पैसा हा इतर शहरात जातो. त्यामुळे मनपाने नुकसान होते. बाहेरून शहरात येणाऱ्या निवासी, व्यापारी, ज्यांची आर्थीक परिस्थीती कमकुवत असते ते घर, दुकान विकत घेऊ शकत नाहीत. अश्या लोकांना येथील कर पद्धतीमुळे घर, दुकान अति महाग भाड्याने घ्यावे लागते. त्यांची आर्थीक कुचंबणा होते. यामुळे ते व्यवसाय करू शकत नाही. पर्यायाने शहराच्या विकासाला बाधा पोहोचते, असे या निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे. शहरातील व्यापार ५० टक्केपर्यंत कमी झालेला आहे. बरीच प्रतिष्ठाने रिकामी पडली आहेत किंवा बंद आहेत. यापूर्वी सुद्धा जकातच्या चुकीच्या पद्धतीमुळे बराचसा व्यापार मनपा हद्दीबाहेर बिजीलैण्ड, सिटी लॅण्डमध्ये गेलेला आहे. औरंगाबाद येथे स्वतः वापराची व भाडे तत्वावर दिली जाणारी व्यावसायिक इमारतीला एकाच दराने संपत्ती कर आकारणी होते, असे आयुक्तांना यावेळी सांगण्यात आले. यासंदर्भात मनपा आयुक्तांसोबत झालेल्या चर्चेत स्वतः वापराच्या व भाडेतत्वावर दिलेल्या व्यावसायिक इमारतीच्या मालमत्ताकराची आकारणी सारखीच असावी, असे सांगितले. याबाबत मालमत्ता धारकानी झोन कार्यालयांमध्ये सहायक आयुक्तांकडे लेखी तक्रार करावी, असे आयुक्त सचिन कलंत्रे व सहआयुक्त महेश देशमुख यांनी सांगितले. निवेदन देतेवेळी अध्यक्ष सुरेश जैन, अतुल कलमकर, बकुल कक्कड़, सूदीप जैन, शैलेश वानखड़े, ओमप्रकाश खेमचंदानी, राजेश डागा, अनिल नरेडी उपस्थित होते.

## तूर व सोयाबीनची खरेदी तत्काळ सुरू करा

### बाजार समिती संचालकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष हरीश मोरे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने मंगळवारी (ता. १४) दुपारी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदन देऊन तूर व सोयाबीन खरेदी तातडीने सुरू करण्याची मागणी केली. पोर्टल बंद झाल्यामुळे सोयाबीन खरेदीत तांत्रिक अडथळे निर्माण झाले तसेच व्यापाऱ्यानी बाजारात तूरीचे भाव पाडले आहेत. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे अशा परिस्थितीत ताबडतोब शासकीय खरेदी सुरू करावी. सोयाबीन व तूर या दोन्हीसाठी स्वतंत्र निवेदने यावेळी देण्यात आली.जाळ्यात



हजारो शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीन पडून असल्याचे सांगण्यात आले. तसेच सोयाबीन विक्रीसाठी शासकीय एजन्सीकडे नोंदणीही करण्यात आली आहे. रविवार रात्रीपासून पोर्टल बंद आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत मिळावी, यासाठीनाफेडमार्फत शासकीय खरेदी सुरू करण्याची विनंती सरकारला करण्यात आली. निवेदन देताना भय्यासाहेब निर्मळ, नाना नागमोते, किशोर चांगोले, मिलिंद तायडे, श्रीकांत बोंडे आशुतोष देशमुख, अलका देशमुख कोकाटे, काळबांडे उपस्थि होते.

## विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी समुपदेशकांची नियुक्त

### संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५अमरावती–**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी– मार्च २०२५ करिता विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात येणाऱ्या अडचणी सोडविण्याकरिता अमरावती विभागीय मंडळाच्या स्तरावर हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली असून जिल्हानिहाय समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे.ही सुविधा दि. ५ फेब्रुवारी २०२५ ते लेखी परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधी दरम्यान सकाळी ८ ते सायं. ८ पर्यंत सुरू ठेवण्यात येईल. या हेल्पलाईनकरिता पुढीलप्रमाणे अधिकारी, कर्मचारी व समुपदेकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तपशील पुढीलप्रमाणे :समुपदेशक, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे यांचे नाव, पद व भ्रमणध्वनी क्रमांक :चंद्रशेखर म. गुलवाडे (अमरावती जिल्ह्याकरिता) – ८००७०४२४० , मनिष भडांगे समुपदेशक (अकोला व वाशिम जिल्ह्याकरिता)– ९४२२१९०६७८, किशोर बनारस समुपदेशक (यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्याकरिता)– ९४२२४४९३४५, नंदकिशोर साखरकर वरिष्ठ अधिक्षक (इ. १० वी)–९८३४७२६३२८ श्रीमती पोर्णिमा कन्नमवार व.अधिक्षक (इ. १२ वी.) ९६७३१६३५२१, एस.एम. पंचगल्ले पर्यवेक्षक (इ. १२ वी. ) –९४२१०८७९९६ , श्री. ए.व्ही. नागरे पर्यवेक्षक (इ. १२ वी.) ७२७६४८७१४० श्री. बी. डी. मुंडे पर्यवेक्षक (इ. १० वी.) ९१५८०४२७९७ श्री. मच्छींद्र खरात पर्यवेक्षक (इ. १० वी.) ७९७२६०८८१२ याप्रमाणे आहेत.तसेच कार्यालयीन हेल्पलाईन दुरध्वनी क्रमांक ०७२१–२६६२६४७ असून विद्यार्थ्यांनी परीक्षेसंदर्भात काही अडचणी असल्यास वरील हेल्पलाईन दुरध्वनी क्रमांकांवर तसेच समुपदेशकांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा,

# पुढच्या मकर संक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीसांसोबत एकत्र दिसतील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात भाजपाच्या नेतृत्वात महायुतीचं सरकार आलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी नागपुरात देवेंद्र फडणवीसांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. त्यातच आज मकरसंक्रांतीच्या दिवशी आमदार रवी राणा यांनी मोठा दावा केला आहे. पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीसांसोबत दिसतील असं विधान त्यांनी केल्याने चर्चेला उधाण आले आहे.

आमदार रवी राणा म्हणाले की, राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खा आणि गोड गोड बोलावं अशी विनंती आहे. देवेंद्र फडणवीस यांना भेटून उद्धव ठाकरे एक पाऊल पुढे आलेत. पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांसोबत दिसतील. मोदींचं नेतृत्व उद्धव ठाकरेंनी खुल्या मनाने स्वीकारले तर नक्कीच हे होईल. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुढे जाणार आहे. त्यांच्यात नेतृत्वात आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा- युवा स्वाभिमान पक्ष रिंगणात उतरेल. कुठल्याही निवडणुकीत आम्ही एकत्रित राहू असं त्यांनी सांगितले.



तसेच राजकारणात लोकांनी दिलेला निर्णय स्वीकारला पाहिजे. प्रवीण तायडे सक्षम आमदार अचलपूरमधून निवडले आहे. ते जे काही विकासकामे मतदारसंघात करतील त्यांना बच्चू कडू यांनी पाठिंबा दिला पाहिजे. लोकशाहीत पराभव झाल्यानंतर तो स्वीकारून सगळ्यांनी अमरावतीच्या विकासासाठी एकत्र आले पाहिजे. विरोधकांनी तिळगूळ खावं आणि गोड गोड बोलावे, विकासासाठी एकत्र यावे असं आवाहनही रवी राणा यांनी स्थानिक राजकीय नेत्यांना केले आहे.

## ठाकरे-फडणवीस जवळीक, शिंदेसेनेसाठी धोक्याची?

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांवर घणाघात केला होता. एकतर तू राहशील किंवा मी राहीन असं सांगत ठाकरेंनी फडणवीसांवर प्रत्येक सभेतून हल्लाबोल केला तरीही निकालानंतर उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीने चर्चांना उधाण आले. उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत असं विधान फडणवीसांनी केले होते. त्या विधानावर शिवसेना मंत्री गुलाबराव पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. हे लोक कुणाचेच नाहीत असं सांगत फडणवीसांनी विचार करायला हवा असा सल्ला गुलाबराव पाटलांनी दिला होता. त्यात आता शिंदेंच्या शिवसेनेकडून बाळासाहेब ठाकरे स्मारक समितीतून उद्धव ठाकरेंची हकालपट्टी करावी अशी मागणीही करण्यात आली आहे.

# वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रमात मासाहेब जिजाऊ जयंती सोहळा

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१५अमरावती,** स्थानिक अभियंता भवन येथे सुरू असलेल्या १ जानेवारी ते २१जानेवारी वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रमात जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. राष्ट्रमाता जिजाऊं यांच्या १२ जानेवारी रोजी ४२७ व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सर्वप्रथम मा साहेब जिजाऊ चे फोटोला हार अर्पण करून व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.यानंतर स्वरा द्या एंटरटेनमेंट च्या संचालिका स्वामिनी तायडे यांनी



जिजाऊ वंदना गाऊन पुढील कार्यक्रमाला सुरुवात केली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी मासाहेब जिजाऊ यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.जिजाऊंच्या लेकिनी साकारलेल्या शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिकात्मक वेशभूषा सुद्धा लक्ष वेदी ठरल्या होत्या. यावेळी जिजाऊंचे लेकींनी तुमचं आमचं नातं काय जय जिजाऊ जय शिवराय अशा गगनभेदी घोषणा देऊन संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. यावेळी जिजाऊंच्या लेकीने वेगवेगळ्या वेशभूषेत आपली नृत्य सादर करून रसिकांची मने जिंकली होती.तसेच स्वरा द्या एंटरटेनमेंट चे संचालक दिनकर तायडे व स्वामिनी तायडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजाची गाणी गाऊन अभियंता भवन दणाणून सोडले होते.यायावेळी स्वरध्या एंटरटेनमेंट व मनीष पाटील फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी तसेच परिसरातील श्रोतेगण उपस्थित होते.

# राष्ट्रीय युवक दिनानिमित्त उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम

## चांदूर रेल्वेच्या आयटीआयमध्ये आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५चांदूर रेल्वे**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे येथे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवादिनी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम प्राचार्य दिनेश बोबडे व प्रभारी प्राचार्य निरंजन मुरादे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य निरंजन मुरादे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. नितीन टाले, से.फ.ला. हायस्कूलचे प्रा. विलास जाधव,



उद्योजक निशिकांत देशमुख, भुषण वानरे, शिल्पनिदेशक विनोद रेवस्कर, लिपिक जयश्री लोखंडे आदींची मंचावर उपस्थिती होती. सर्वप्रथम स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या फोटोला हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आजच्या तरुणांना पुढील भविष्यासाठी रोजगाराच्या दृष्टीने मार्गदर्शन सुद्धा केल्या गेले. यादरम्यान विविध पारंपरिक क्रीडा स्पर्धेतील विजेते, उपविजेते व इतर विविध स्पर्धेतील विजेत्यांना सुध्दा गौरविण्यात आले. याचदरम्यान संस्थेचे माजी प्रशिक्षणार्थी व यशस्वी उद्योजक यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त करून स्वयंरोजगाराविषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे संचालन प्रमोद वारकड, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रकाश ठाकरे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता आयटीआयचे शिल्पनिदेशक संजय गुल्हाणे, प्रफुल्ल गावड, प्रशांत पाचपोर, श्रीकांत ठाकरे, लिलाधर दांदडे, ऋतिक सावदे, प्रविण डोंगरे, शरद बेहरे, राजेश मेश्राम, सुरज चांदूरकर, जयश्री रंगारी, वृषाली भडके, कर्मचारी तेजस इमले, प्रविण पुंड यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# सारथीच्या धर्तीवर आता अमरावतीत महाज्योती संस्थेचे विभागीय केंद्र

## आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मानले मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ मुंबई –** सारथी संस्थेच्या अमरावती विभागीय केंद्र प्रमाणेच महाज्योती संस्थेचे केंद्र अमरावती मध्ये स्थापन करण्याची बाब अमरावतीच्या आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या निवडणूक पूर्व जाहीरनाम्याचा मुख्य अजेंड्यावर होती. निवडून येताच आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी महायुती सरकारकडे पाठपुरावा केला असल्याने अमरावती मध्ये आता महाज्योती अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थे मार्फत अमरावती विभागीय केंद्र स्थापन होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस यांनी नुकतीच दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृह येथे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या कृती कार्यक्रम आराखड्याच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी बैठक बोलाविली असता महाज्योती संस्थेमार्फत पुणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या पाच प्रमुख जिल्ह्यांमध्ये उत्कृष्टता केंद्र (एु-लशश्रश्रशपलश उशपीींशी) स्थापन करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अमरावती मध्ये सुद्धा महाज्योतीच्या उत्कृष्टता केंद्रा मार्फत विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांचे कोचिंग, अभ्यासिका आणि फेलोशिपसारख्या योजना राबविण्यात येणार आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या हिताला घेऊन महायुती सरकारने सकारात्मक पाऊल उचलल्याबद्दल अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस तसेच महायुती सरकारचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी ), विमुक्त जाती(व्हीजे ), भटक्या जमाती (एनटी ), आणि विशेष मागास वर्ग (एसबीसी ) समाज घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि



आर्थिक विकासाकरीता शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत महाज्योती अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था नागपूर येथे कार्यरत आहे. महाज्योती संस्थेच्या वतीने सामाजिक शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असून

कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच रोजगार, स्वयंरोजगार, उद्यमशिलता, औद्योगिक घटकांची उभारणी व विकास यासाठी क्षमता निर्मितीसाठी विविध योजना व उपाययोजना राबविण्यात येतात. तसेच महाज्योती मार्फत महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास - प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी या हेतूने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, जेईई/नीट /एमएचटी सीईटी/ एमपीएससी ,यूपीएससी आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते. उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी या करिता कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो तसेच विविध संशोधन कार्याला प्रोत्साहन मिळावे याकरिता पीएचडी व एम.फिल करणाऱ्या उमेदवारांना अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते.

महाज्योतीच्या लाभार्थ्यांना योजनांचा लाभ पोहचविणे सुलभ व्हावे या हेतूने महाज्योती संस्थेचे विभागीय कार्यालय अमरावती येथे स्थापन करण्यासाठी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मागील पंचवार्षीक काळात शासनाकडे पाठपुरावा केला. तसेच आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यातही सदर बाब अंतर्भूत करून प्रचारा दरम्यान सुद्धा आगामी काळात सारथी च्या धर्तीवर अमरावती मध्ये महाज्योतीचे विभागीय केंद्र स्थापन करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले होते.

निवडून येताच आमदार महोदयांनी मतदार संघात सक्रिय राहून शासनस्तरावर सुद्धा विविध कामकाजाला घेऊन पाठपुरावा सुरु केला आहे. याची फलश्रुती म्हणून मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आढावा घेतला असता राज्यात महाज्योती संस्थे मार्फत पुणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या पाच प्रमुख जिल्ह्यांमध्ये उत्कृष्टता केंद्र (एुलशश्रश्रशपलश उशप-ींशी) स्थापन करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. महाज्योतीच्या लाभार्थ्यांना योजनांचा लाभ पोहचविणे सुलभ व्हावे या हेतूने महाज्योतीचे विभागीय कार्यालय अमरावती येथे मंजूर केल्या बद्दल अमरावतीच्या आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस तसेच महायुती सरकारचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

# वासेवाडी येथे खंडोबा नवरात्री यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५भातकुली**

भातकुली तालुक्यातील वासेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे खंडोबा नवरात्री यात्रा महोत्सव निमित्ताने वंदनिय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज ५६ वा व कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सव तथा सर्व संत स्मृती दिन निमीत्ययुगग्रंथ ग्रामगीता संकिर्तण संगित भागवत सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,

ह.भ.प संकेत काळे महाराज, गुरुचार्य वेरूळकर( गुरुजी )यांच्या मधुर वाणीतून संगीतमय भागवत कथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गाडगे महाराज यांच्या विचारावर प्रबोधन करण्यात आले,प्रत्येक नागरिकाच्या घरासमोर रांगोळ्या आणि दिवाळी सारखे घरासमोर दीपा प्रज्वलित करण्यात आले.

गावामधून भजन कीर्तनाच्या संगीतमय वातावरणामध्ये खंडोबा रायाची मिरवणूक काढण्यात आली,बडनेरा विधानसभा मतदारसंघाचेआमदार रवी राणा यांचे गावकऱ्यांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले,यात्रा महोत्सव कार्यक्रमादरम्यान सासरवरून आलेल्या मुलींना साडी चोळी भेटवस्तू आलेल्या सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विलास रोकडे संकल्पनेतून आमदार रवी राणा यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले,वासेवाडी गावाचे पुनर्वसन करणार असल्याचे आमदार रवी राणा यांनी नागरिकांना आश्वासन दिले,

यावेळी अविनाश संनके सरपंच निंभा वासेवाडी,श्रीकृष्ण बैलमारे,विठ्ठल सेरीसे,सुनील वानखडे ,नितेश रोकडे,रामप्रसाद सनके,नरेंद्र भांबुरकर, नरेंद्र जोगी,शुभम रोकडे यांच्या सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# सुधारित पट्टा पेर पद्धतीने हरभरा पेरणीकडे वाढला कल

## कृषी विभागाच्या आवाहनाला चांदूर रेल्वे तालुक्यात यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे तालुक्यामध्ये खरीप हंगामातील सोयाबीन व तूर पिकाची पेरणी सुधारित पट्टा पेर पद्धतीने वाढलेली आहे. त्याचबरोबर रब्बी हंगामातही हरभरा पिकाची पेरणी सुधारित पट्टा पेर पद्धतीने वाढल्याचे दिसत आहे. त्यामुळे स्थानिक कृषी विभागाच्या आवाहनाला यश मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. चांदूर रेल्वे तालुक्यात एकूण ८ हजार ७४९ हेक्टरवर हरभरा पिकाची लागवड झालेली आहे. त्यापैकी अंदाजे ५०० हेक्टरपर्यंत सुधारित पट्टा पेर पद्धतीने हरभरा लागवड झाल्याचे दिसून येत आहे. पट्टा पेर पेरणी पद्धत म्हणजे हरभरा पिकाच्या ६ ते ७ ओळीनंतर एक ओळ रिकामी ठेवणे होय. पारंपरिक हरभरा पेरणीत शेतकरी बांधवांना काही दोष व त्रुटी दिसून आलेल्या आहेत. त्या म्हणजे पारंपरिक पेरणीमध्ये हरभऱ्याला फुलोरा आल्यानंतर त्या शेतात फिरणे अवघड जाते, पिकामध्ये चालता येत नाही. तसेच फवारणी करणाऱ्याला फवारणी करताना अडथळा येतो, तो केव्हाही तोल जाऊन पडू शकतो. त्याचप्रमाणे स्प्रिंकलरने पाणी देताना, स्पिंकलर पाइप टाकताना शेतकऱ्यांना सोयीस्कर होत नाही. याशिवाय फवारणी




करताना फवारणीची सुरुवात एका ओळीपासून केल्यास शेवटपर्यंत त्याच ओळीत राहील याची शाश्वती देता येत नाही, म्हणजेच फवारणी करताना पारंपरिक पद्धतीमध्ये काही भाग हमखास सुटतो. सुधारित पट्टा पेर पद्धतीमध्ये हे दोष राहत नाहीत. ६ ते ७ ओळीनंतर एक ओळ रिकामी ठेवल्यामुळे शेतकरी बांधवांना पिकाच्या फुलोरा अवस्थेनंतरही संपूर्ण शेतामध्ये व्यवस्थित फिरता येते, तसेच फवारणी करणाऱ्याला फवारणी करताना सोयीस्करपणे फवारणी करता येते. सर्व पिकाला हवा व सूर्यप्रकाश चांगल्या पद्धतीने मिळण्यास मदत होते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे शेतकऱ्यांनी ६ ते ७ ओळीनंतर एक ओळ रिकामी ठेवली तरी उत्पादनात कोणतीही घट दिसून आलेली नाही. त्यामुळेच चांदूर रेल्वे तालुक्यात दिवसेंदिवस सुधारित पट्टा पेरणी पद्धतीने पेरणी वाढताना दिसून येत आहे. या सुधारित पेरणीच्या पद्धतीविषयी शेतकरी समाधानी आहेत. यामागे सर्व कृषी सहाय्यकांनी मोलाची भूमिका पार पाडलेली आहे. सलग ३ वर्षांपासून माझ्या ५० एकर शेतामध्ये सुधारित पट्टा पेर पद्धतीने हरभरा पेरत असून, त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत, असे बग्गी येथील शेतकरी मोरेश्वर गोळे यांनी सांगितले. तसेच सुधारित पद्धतीने पेरणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. ही शेतकरी व कृषी विभागासाठी सुखद बाब असल्याचे चांदूर रेल्वेचे तालुका कृषी अधिकारी एस. एम. ढाकरे यांनी सांगितले आहे. सुधारित पट्टा पेर पद्धतीमुळे शेतकरी बांधवांच्या १५ टक्के बियाण्यांची बचत होत आहे आणि उत्पादनात १५ टक्क्यांनी वाढ होत असल्याचे मत कृषी सहायक तथा पेरणी मार्गदर्शक अमोल चौकडे यांनी व्यक्त केले.

# राज्य शासनाची मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते विकास योजना कागदोपत्री

## जिल्ह्यातील अनेक रस्त्यांची अवस्था बिकट : लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची ग्रामस्थांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागातअनेक मुख्य रस्ते खड्डेमय आहेत. रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ते हे समजणे कठीण झाले आहे. पाणंद रस्त्यांच्या बिकट अवस्थेमुळे शेती विकासाला ब्रेक लागला आहे. जगाच्या पोशिंद्याची यामध्ये परवड होताना पाहायला मिळत आहे. शासनाची पाणंद रस्ते विकास योजना कागदावरच दिसत आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष घालणार काय, असा प्रश्न विचारला जात आहे. शेतकरी व नागरिकही त्रस्त आहेत.केंद्र व राज्य शासनाने नागरिकांसाठी 'शासन आपल्या दारी', 'मेरी मिट्टी मेरा देश' यासारखे बरेच उपक्रम राबविले. या योजनांची उपयोगिता किती हे शासनाला व नागरिकांनाच माहीत आहे.



### लोकवर्गणीतून पाणंद रस्त्यांची सुधारणा

शेती व्यवसायासाठी महत्त्वाच्या असलेल्या शेत रस्त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, पदरमोड करून आर्थिकदृष्ट्या खालावलेल्या, मात्र मनाची श्रीमंती असलेल्या शेतकऱ्यांना लोकवर्गणीतून पाणंद रस्त्याची दुरुस्ती करण्याची वेळ आली आहे. तसे प्रयत्नही शेतकऱ्यांकडून होत असल्याचे चित्र अमरावती तालुक्यातच पाहावयास मिळत आहे.

### शेजारील गाव व शेतात जाण्यासाठी अडचणी

१) रात्री-बेरात्री शेतामध्ये पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागते. रात्रीला कुणी आजारी पडले तर शेजारच्या मोठ्या गावांत किंवा शहराच्या ठिकाणी उपचारार्थ दवाखान्यात यावे लागते. मात्र, ग्रामीण रस्त्यांसह शेतशिवारातील पाणंद रस्ते आजही दुर्लक्षित आहेत.

२) भातकुली तालुक्यातील पाणंद रस्त्यांच्या दुरवस्थेने शेतीची वाट बिकट झाली आहे. शासनाने पाणंद रस्ते योजनेच्या नावात बदल करीत मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना असे नामकरण केले आहे. मात्र, ही योजनादेखील इतर योजनांप्रमाणे कागदावरच राहिल्याने आजही पाणंद रस्त्यांचा प्रश्न निकाली निघाला नाही, ही जिल्ह्यातील तालुक्यासाठी दुर्दैवी बाब मानली जात आहे.

# पुण्याहून नागपूरला जाणाऱ्या लक्झरी बसचा समृद्धी महामार्गावर धामणगाव रेल्वे नजीक भीषण अपघात; बसचालक जागीच ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ धामणगाव रेल्वे**

समृद्धी महामार्गावर भीषण अपघाताची बातमी समोर आली आहे. पुण्याहून नागपूरकडे जाणाऱ्या लक्झरी बसची ट्रकला जोरदार धडक झाली आहे. या अपघातात बस चालकाचा जागीच मृत्यू झाला असून १५ प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना आज पहाटेच्या सुमारास अमरावतीच्या जवळ असणाऱ्या धामणगाव येथील मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशन हद्दीत आष्टा नजीक हा अपघात




घडल्याची माहिती समोर आली आहे.याबाबत अधिक माहिती अशी कि, पुणे वरून नागपूर जाणारी ही ट्रॅव्हल्स होती. यामध्ये अंदाजे ३० च्या जवळपास प्रवासी प्रवास करीत होते. दरम्यान, समृद्धी महामार्गावर भरधाव वेगात जाणाऱ्या ट्रकला लक्झरी बसची जोरदार धडक बसल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात लक्झरी बसचालक जागीच ठार झाला असून बसच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच दत्तापूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी तसेच मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशनचे कर्मचारी व वाहतूक पोलीस आणि एमएसआरडीची रेस्क्यू टीम त्याठिकाणी दाखल झाले. जखमींना तात्काळ ग्रामीण रुणालय धामणगाव रेल्वे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत. समृद्धी महामार्ग प्रवाशांसाठी काळ ठरत असून सातत्याने होणाऱ्या भीषण अपघातांच्या घटनांनी अनेक कुटुंब उद्धवस्त होत आहेत.

# ...आता बिबट्यांचीही नसबंदी, राज्य सरकार केंद्राकडे पाठवणार प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

राज्यातील बिबट्यांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी त्यांची नसबंदी करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव लवकरच केंद्र सरकारकडे पाठवला जाईल, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले.



वन्यप्राण्यांनी पिकांचे नुकसान केल्यानंतर शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या भरपाईचा आढावा घेऊन त्यात योग्य तो बदल केला जाईल, असेही मंत्री नाईक म्हणाले. विधानपरिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनी चार दिवसांपूर्वी बिबट्यांच्या नसबंदीबाबत पत्र दिले होते.

### वर्षभरात १३ वाघांचा मृत्यू; सापळे, झुंजीमुळेही घटना

गत एप्रिलपासून आजपर्यंत राज्यात १३ वाघांचा मृत्यू झाला. काही ठिकाणी डुकरांची शिकार करण्यासाठी लावलेल्या सापळ्यांत वाघ अडकले आहेत. आपले क्षेत्र पक्के करण्यासाठी झालेल्या झुंजीमध्ये काही वाघांचा मृत्यू झाला आहे.

नागपूरच्या प्राणिसंग्रहालयात बीफऐवजी कोंबडीचे मांस दिले, त्यामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने वाघांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. कोंबडीचे मटन का देण्यात आले, या बाबील जबाबदार कोण, याचीही चौकशी करण्यात येईल, असे वनमंत्री नाईक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

## जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सादर केला कलेचा आविष्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

जिल्हा परिषद शिक्षण विभाग अंतर्गत जिल्हा स्तरीय प्राथमिक शालेय क्रिडा क्रिडा व सांस्कृतिक महोत्सव येथील श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालाच्या पटांगणात सुरू आहे.दरम्यान सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये करावके गीत,समुह नृत्य,भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत, अभिनय, हास्य जत्रा असे बहारदार कार्यक्रम सादर करण्यात येत आहे.सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी कलेचा आविष्कार सादर केला. जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हास्तरीय प्राथमिक शाळेत क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाला सुरुवात झाली होती. सांस्कृतिक कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने, गंगाधर मोहने, प्रविण खांडेकर यांच्यासह गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख आदींची उपस्थिती होती.



दरम्यान सांस्कतिक कार्यक्रमामध्ये भातकुली,अंजनगाव सुर्जी,वरूड, धारणी, तिवसा, धामणगाव रेल्वे, दर्यापूर, मोर्शी, चांदुर रेल्वे, चांदुर बाजार, नांदगाव खंडेश्वर, अचलपूर,अमरावती, तिवसा, चिखलदरा या पंचायत समितीमधील विद्यार्थ्यांनी आपला कलेचा आविष्कार सादर केला.यात भातकुली पंचायत समितीतील कानफोडी, वाकी रायपूर शाळेने निदर्शने व नृत्य सादर केले.अंजनगाव पंचायत समितीतील विहिगाव शाळेने ग्रामीण नाट्य व आदिवासी नृत्य सादर केले.वरूड पंचायत समितीतील खाडा शाळेने आदिवासी नृत्य व सावंगी शाळेने एकल नृत्य सादर केले. धारणी पंचायत समितीतील जांबु शाळेने संगीतमय नाटिका, मोगर्दा शाळेने समूह नृत्य तर हातिदा शाळेने लावणी सादर केली.तिवसा पंचायत समितीमधील धोत्रा शाळेच्या गौरी वानखडे हिने लावणी नृत्य सादर केले.दिवानखेड शाळेने निदर्शने सादर केलीत.धामणगाव पंचायत समितीतील झाडा शाळेने ' सूनो बेटी शस्त्र उठालो ' हा कार्यक्रम सादर केला.तळेगाव दशासर सोशल मिडीयाचा गैरवापर यावर निदर्शने सादर केली.तर पिंपळखुटा तेथील इयत्ता पहिलीतील सानवी भोयर या विद्यार्थिनीने ' मी सरपंच बोलते' हे एकपात्री नाटिका सादर केली.दर्यापूर पंचायत समितीमधील रामतीर्थ,करतखेडा व पेठ इबारतपुर शाळेने कार्यक्रम सादर केले.सांस्कृतिक कार्यक्रमांचे परीक्षक म्हणून प्रा.डॉ.मनोज उज्जैनकर,प्रा.अमोल पानबुडे,जान्हवी काळे हे उपस्थित होते.असे प्रसिध्दी समितीचे प्रमुख विनोद गाढे,विनायक लकडे,शकील अहमद,राजेश सावरकर,श्रीनाथ वानखडे यांनी कळविले आहे.

# २,९४० बेकायदेशीर भोंग्यांवर काय कारवाई केली? हायकोर्टाने राज्य सरकारला मागितलं उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

मुंबईउच्च न्यायालयाने राज्यभरातील विविध धार्मिक आणि इतर संस्थांमध्ये लावण्यात आलेल्या बेकायदेशीर लाऊडस्पीकरवर केलेल्या दंडात्मक कारवाईचा तपशील मागवला आहे. उच्च न्यायालयाने राज्याचे गृह विभाग आणि राज्याचे पोलीस महासंचालक यांना कारवाईचा तपशील देण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्य न्यायमूर्ती डीके उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने या मुद्द्यावर ६ आठवड्यांच्या आत माहिती सादर करण्यास सांगितले आहे. त्यामुळे आता मुंबईतील बेकायदा लाऊडस्पीकरवरच्या मुद्द्यावरुन मुंबई उच्च न्यायालयाचे कडक पावले उचलताना दिसत आहे.



मुंबई उच्च न्यायालयाने पोलीस महासंचालक आणि महाराष्ट्राच्या गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना परवानगीशिवाय चालणाऱ्या सुमारे २,९४० बेकायदेशीर लाऊडस्पीकरवर केलेल्या कारवाईची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. कारवाईचा अहवाल सहा आठवड्यांमध्ये सादर करण्याचे आदेश हायकोर्टाने सरकारला दिले आहेत. मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने आदेश दिला.

कोर्टाने बेकायदा लाऊडस्पीकरवर जिल्हानिहाय केलेल्या कारवाईचा तपशील खंडपीठ प्राधिकरणाकडून मागविण्यात आला आहे.

संतोष श्रीकृष्ण पचलग यांनी दाखल केलेल्या अवमान याचिकेतून हे प्रकरण समोर आलं. ज्यात त्यांनी आरोप केला होता की अधिकाऱ्यांनी २०१६ च्या उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले नाही. या प्रकरणावर आधी झालेल्या सुनावणीदरम्यान, ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्याच्या गरजेवरही न्यायालयाने भर दिला होता. योग्य परवानगीशिवाय प्रार्थनास्थळांवर लाऊडस्पीकर किंवा पब्लिक ड्रेस सिस्टमचा वापर केला जाणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले होते. नवी मुंबईतील मशिदींमधील बेकायदेशीरपणे लावलेले लाऊडस्पीकर हटवण्याची मागणी करत पचलाग यांनी २०१४ मध्ये पहिल्यांदा उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर २०१६ च्या निर्णयाचे पालन न केल्याबद्दल झालेल्या त्यांनी कोर्टात अवमान याचिका दाखल केली.

आरटीआयनुसार मंदिरे, मशिदी, दर्गे, चर्च, गुरुद्वारा आणि बुद्ध विहारांसह २,९४० धार्मिक संस्थांमध्ये बेकायदेशीर लाऊडस्पीकर बसवण्यात आल्याचे त्यांनी याचिकेत म्हटलं. धार्मिक स्थळांवर लावण्यात आलेल्या बेकायदेशीर ध्वनिक्षेपकांविरोधातील कारवाईबाबत २०१६ मध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे मंगळवारी खंडपीठाने राज्याच्या गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांना याचिकेत पक्षकार बनवण्याचे निर्देश दिले. त्यांना नोटीसही बजावण्यात आली आहे. १८ मार्च २०२५ रोजी हायकोर्टात या प्रकरणी पुन्हा सुनावणी होणार आहे.

# वाल्मिक कराडच्या कुटुंबाला भेटला, संतोषभैय्याकडे का गेला नाही : मनोज जरांगे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ जालना :**

लोकांचे घर उद्धवस्त करायचे, संतोष भैयांचा क्रूरपणे खून करायचा आणि तो व्हिडीओ कॉल बघून आनंद व्यक्त करायचा, अशा आरोपींसाठी तुम्ही आंदोलन करताय. त्याला पाठिंबा देताय. आता धनंजय मुंडेंच्या टोळीने ही नवीन पद्धत पाडल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला. संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांसाठी न्याय मागायचा नाही का? की तुमच्यासारखे आरोपीच्या मागे उभे राहायच? असा सवालही जरांगे यांनी केला.



मनोज जरांगे म्हणाले की, मुख्यमंत्र्याकडे आमची मागणी आहे की खंडणीतले आणि खुनातले आरोपी एकच आहेत. ही केस अंडर ट्रायल चालली पाहिजे, यातून कुणीही सुटता कामा नये. आरोपी ज्याच्या घरी राहिले त्याला सुद्धा आरोपी करायला पाहिजे. या सर्वांची नार्को टेस्ट होणं गरजेचं आहे. परळीतल्या एका कोपऱ्यातल्या आंदोलनामुळे काय होणार? आम्ही त्यापेक्षा दहापट आंदोलन बीडमध्ये उभं करू? आम्ही सुद्धा सळो की पळो करू शकतो.

फडणवीस साहेबांनी या टोळीचा संपूर्ण नायनाट करायला पाहिजे. यातील एकही आरोपी सुटता कामा नये, नाहीतर मुख्यमंत्रीसाहेब तुमच्या नावाला डाग लागेल असंही मनोज जरांगे म्हणाले.

### देशमुखांच्या कुटुंबीयांना भेटला नाही?

धनंजय मुंडे यांनी परळीत आल्यानंतर वाल्मिक कराडच्या कुटुंबीयांना भेट दिली. त्यावरून मनोज जरांगे यांनी त्यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, चांगलं काम केलं त्यांनी. मंत्रिपदाचा फायदा घेतो. संतोष भैय्याचं कुटुंब उद्धवस्त केलं तुझ्या लोकांनी. संतोष भैय्याच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीवरून हात फिरवायला तुला वेळ मिळाला नाही का?

# खासदार रक्तदान मोहिमेचा डॉ.अनिल बोंडे यांनी घेतला आढावा


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

राज्यसभेचे खासदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांच्या संकल्पनेतून खासदार रक्तदान महायज्ञ मोहिमे अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात सतत ३६५ दिवस रक्तदान शिबिर आयोजित केली जात आहेत. या मोहिमेला जिल्ह्यात व्यापक प्रतिसाद मिळत आहे. आगामी काळातील अनेक तारखा देखील रक्तदानाच्या बुक झालेल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर या संपूर्ण बाबीचा आढावा डॉ. अनिल बोंडे यांनी घेतला. दरम्यान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुरेश आसोले यांनी यासंदर्भातील माहिती त्यांना दिली.

खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या संकल्पनेतून आणि डॉ. वसुधा बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात नवीन वर्षापासून अर्थात १ जानेवारी २०२५ पासून खासदार रक्तदान महायज्ञाला सुरुवात झालेली आहे. सतत ३६५ दिवस

## डीएचओ, सीएस यांची उपस्थिती;रक्तदान मोहीम आणखीन गती घेणार

संपूर्ण अमरावती जिल्ह्यात डॉ. अनिल बोंडे यांच्यातर्फे रक्तदान शिबिर घेतले जात आहेत. या शिबिरांना व्यापक असा प्रतिसाद मिळत आहे. शिबिरातून प्राप्त होणारे ब्लड हे जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्त पिढीला दिले जात आहे. आगामी काळात ही मोहीम अधिक व्यापकपणे राबवण्याच्या सूचना डॉ.अनिल बोंडे यांनी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले आहेत.



उन्हाळ्यात रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण होतो. त्यामुळे अनेक गरजवंत रुग्णांना रक्त मिळण्यास अडचणी येतात. ही बाब लक्षात घेता पुढील काही महिन्यांचे नियोजन देखील डॉ.अनिल बोंडे यांच्याकडून करण्यात आलेले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे, डॉ. सुरेश आसोले, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी मिलिंद तायडे, योगेश पानझडे, खासदार प्रतिनिधी म्हणून या मोहिमेत जातीने लक्ष घालून शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणार्या वैदही उपासने, रविकिरण वाघमारे, सुनील सोमवंशी, ऋषिकेश दुर्गे, धीरज चौधरी, प्रीतम आ अब्रुक, रमेश वराडे, गिरीश काळे, यश गवई, शुभम मांडळे, शंतनू बांबल यांच्यातर्फे देखील रक्तदान मोहीम आयोजन नियोजन समन्वय आणि मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले जात आहेत.

### रक्तदान शिबिरासाठी पुढे या – अनिल बोंडे

नवीन वर्षापासून सुरू झालेली ही रक्तदानाची मोहीम पाहता पाहता सर्व नागरिकांच्या यशस्वी प्रतिसादामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विस्तारली आहे. अनेक ठिकाणाहून रक्तदान शिबिर आयोजित करण्यासाठी संपर्क केला जात आहे. ज्या ठिकाणी शिबिर संपन्न झाली, अशा सर्व नागरिकांचे डॉ.अनिल बोंडे यांनी आभार मानले आहेत. तर आगामी काळात शिबिर आयोजित करण्यासाठी सामाजिक संस्था, भाजप पदाधिकारी नागरिकांनी समोर यावे, असं आव्हान देखील त्यांनी केले आहे. जेणेकरून भविष्यात रक्ताविना कोणत्याही रुग्णाला प्राणापासून मुकावे लागणार नाही, अशी वेळ कुणावरही येऊ नये यासाठी सर्व नागरिकांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या या महायज्ञात योगदान द्यावे, असेही त्यांनी म्हटले आहे.